भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५५० / माहिती कक्ष / वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०४/०८/२०१७

**१)ऑन लाईन खात्यातुन पैसे काढुन फसवणुक केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०२/०७/२०१७ चे पुर्वी पासुन यातील फिर्यादी यज्ञेश्वर गंगाराम टांगले वय ४२ वर्ष रा. दवडीपार बेला याचे बॅक ऑफ इंडीया भंडाराचे शाखेमध्ये ठेवलेल्या रक्कमेतुन ३६,०००/रु ची ऑन लाईन शॉपींग करून कोणीतरी अज्ञात आरोपीने खात्यातुन काढुन फसवणुक केल्याने, फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४२० भादंवि. सहकलम ४३ (अ),६६(क) आयटी ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. आतराम पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) मोटार पंपाची चोरी :—**

दिनांक ०२+०३/०८/२०१७ चे रात्र दर. यातील फिर्यादी यशवंत बारकु गोंडाने वय ५२ वर्ष, रा. सालेबर्डी याचे शेतीला पाणी देण्याकरीता लावलेली २ एचपी ची साबर कंपनीची मोटार पंप कि. ८,०००/रु ची कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा.तलमले पो.स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

**३) संगनमत करून ट्रॅक्टरमधील बॅटरी ,लोखंडी साखळीच्या कडया व तुकडे चोरून नेल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०२/०८/२०१७ चे २२.०० वा. ०३/०८/२०१७ चे ०९.०० वा. दर. यातील फिर्यादी श्रीराम संजयराव बोरकर वय २९ वर्ष, रा. मुरमाडी जिल्हा परिषद गांधी विद्यालय लाखनी/मुरमाडी शाळे समोर आयसर कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एमएच ३६ एल ५३८६ हा ठेवला असता, त्यामधील १२ होल्टची ॲमरान कंपनीची बॅटरी कि.५०००/रु ची, लोखंळी साखळीच्या कडया व तुकडे ८० किलो कि. ३,०००/रु असा एकुन ८,०००/रु चा माल यातील संशयीत आरोपीतांनी संगनमत करून चोरून नेल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७९,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) मंदीरातील दानपेटीत ठेवलेल्या पैशाची चोरी . :—**

दिनांक ०२/०७/२०१७ चे २३७.०० वा.ते दि. ०३/०८/२०१७ चे ०६.०० वा. दर. यातील कोणीतरी अज्ञात चोराने कुनीही नसल्याची संधी साधुन बासपुरी मठ मंदीरातील मागचा दाराचा ताला तोडुन मंदीरात प्रवेश करून मंदीरातील गाभाऱ्याच्या आतील ताला तोडुन दरवाजाच्या जवळ ठेवलेल्या दानपेटीचा ताला तोडुन अंदाजे १०,००/रु ते १५,००० /रु चोरून नेल्याने फिर्यादी राधाकृष्ण उरकुडाजी माहुर्ले वय ४४ वर्ष रा. देशबंधुवार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी आतराम पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) एस.टी बसला अज्ञात ट्रकने मागेहुन धडक मारून नुकसानी केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ०३/०८/२०१७ चे १०.३० वा. दर. यातील एस.टी बस क्र. एमएच ४० /५५९६ च्या चालकाने आपली बस शिक्षक कॉलोनी येथे बस थांब्यावर थांबली असता मागेहुन येणाऱ्या यातील आरोपी ट्रक चालकाने आपले ताब्यातील ट्रक हयगयीने चालवुन एस.टी बसला मागेहुन धडक मारल्याने मागील भाग चेपकुन बसची नुकसान झाल्याने फिर्यादी संगम मानिकराव जवंजाळ वय ३८ वर्ष एस.टी महामंडळ चे ड्रायव्हर रा. गोंदीया, आगार भंडारा विभाग यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,४२७ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी.आतराम पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**६)तुळीची नासाडी केल्याच्या कारणा वरून अश्लिल शब्दात शिवीगाळ करून मारण्या पीठण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ३१/०७/२०१७ चे ०९.०० वा. ते १०.०० वा. दर. यातील आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीचे शेतात जावुन तुळीची नासाडी करून नुकसान केली, व वांग्याचे झाडे लावले यावरून फिर्यादीने आरोपीला तुळीची नासाडी का केली, व वांग्याची झाडे का लावली, असे हटकले असता आरोपीतांनी जमीन तुझी आहे काय असे बोलुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करून मारण्या—पिठण्याची धमकी दिल्याने फिर्यादी षुरूषोत्तम महादेव चौधरी वय ६० वर्ष रा. शिंगोरी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४४७,४२७,२९४,५०६,३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**७)निष्काळजीपने वाहन चालवुन मोटार सायकला धडक मारून दोन जखमी . :—**

दिनांक ३/०८/२०१७ चे १४.०० वा. दर. यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील कार क्र. एमएच ३१ सी.पी १७७६ ही निलज कडुन भरधाव वेगाने,निष्काळजीपने चालवुन पवनी वरून वायगावला जाणाऱ्या मोटार सायकल क्र. एमएच ३१ डीएल ९०४४ ला धडक मारून मोटार सायकल चालक सुरेश मंडपे वय ३० वर्ष मागे बसणारा अश्विन गायमुखे वय २४ वर्ष दोन्ही रा. वायगाव यांना धडक मारून गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पडुन गेल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३३७३३८ भादवी. सहकलम १८४,१३४/१८७ मोवका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. बारेखडे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**८) वाहन सार्वजनीक ठिकाणी आमरोडवर थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या जिवीतास धोका निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०३/०८/२०१७ चे १०.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी हा त्याचे ट्रकने रायपुर कडुन नागपुरकडे जात असतांना एस.टी. बस क्र. ४०/५५९६ चे चालकाने त्याची एस.अी. बस. नो पार्कीग रोडाच्या खली न उतरवता रस्त्यावर वाहतुकीस अडथडा होईल अश्या स्थितीत ऊभी केल्याने फिर्यादी प्रशांत विनायक कांबहे वय ४२ वर्ष रा. मानेवाडा हुडकेश्वर जि. नागपुर यांचे रिपोर्ट वरून पोस्टे. भंडारा येथे कलम २८३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. आतराम पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**९) अवैध दारु अडयावर धाडी . :—**

दिनांक ०३/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो स्टे जवाहरनगर,पवनी येथे अवैध दारू अडयावर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून ४० लिटर हा.भ. दारू किंमती २०००/—रु. १३५ मिलीलीटर देशीरु सेन्ट्रो कार १,३९०००/रु असा एकुन १,४१०००/रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करिता
दुरध्वनी.क्र. ८८५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.